**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय**

**"वनभवन" , रामगिरी रोड, पोलीस जिमखान्याजवळ, सिव्हील लाईन, नागपूर-440 001**

दुरध्वनी क्रमांक-0712 2556937,2555673 फॅक्स क्रमांक 0712-2550675, E-mail : apccfprotection@mahaforest.gov.in


क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र. २५/४५० /१८-१९
नागपूर-४४० ००१, दिनांक ८/०१/२०१९

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर/मुंबई, व कांदळवन मुंबई
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व

विषय:- आगीपासुन वनाचे संरक्षण करण्याबाबत.

संदर्भ:-१.स्थाई आदेश पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्र.क्र.२०४/२०००-०१/२१०, दिनांक २२ मे,२००१
२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र. २५/३६७/२०१८-१९, दि. ११/१२/२०१८.
३. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र. २५/३९९, दि. २९/१२/२०१८.
४.वरीष्ठ वनअधिकारी यांची नागपूर येथे दिनांक ४ व ५ जानेवारी २०१९ मधील दिलेले निर्देश

उपरोक्त संदर्भिय पत्रांकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. वनवणवा हंगाम-२०१९ (१५ फेब्रुवारी ते १५ जुन) करीता दि.२२ मे, २००१ चे स्थाई आदेशानुसार अंम्मलबजावणी करीता खालील निर्देशानुसार कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

वरीष्ठ वनअधिकारी यांचे कार्यशाळेत आगीपासुन वनाचे संरक्षण करण्याबाबत सनियंत्रण व वेळोवेळी त्याचे अंकेक्षण (Audit) करुन आगीवर नियंत्रण ठेवणे सर्व वनाधिकारी/कर्मचारी यांची जबाबदारी आहे.

आगी हया नैसर्गिक आणि मानव निर्मित असतात. बहुतांश आगी हया मानव निर्मितच असतात. मानवनिर्मित आगीची प्रमुख कारणे, जसे स्वतःच्या निजी स्वार्थासाठी, सुड भावणेतुन, निष्काळजीपणा, अनुभव नसणा-या कर्मचा-याकडुन जाळरेषा घेणे, चोरटी शिकार, वनक्षेत्रातील अतिक्रमणे, वनक्षेत्रात वनालगत कोळसा तयार करणे, पावसाळयात भरपूर गवत येण्यासाठी गावक-याकडुन वनक्षेत्रास आगी लावणे ईत्यादी माध्यमातुन आगी लावल्या जातात.

आगीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राबविण्यात येणारी कार्यप्रणाली सर्वकष राहुन त्यामध्ये आग प्रकरणांची योग्य चौकशी होऊन निपटारा करणे, आगीच्या घटनांना प्रतिबंध घालणे, वन कर्मचा-यांची कार्यक्षमता व जागरुकता उंचावणे आवश्यक आहे. आगीबाबतचे गुन्हे हाताळणे बाबत सविस्तरसुचना संदर्भिय स्थाई आदेशमध्ये नमुद केल्या आहेत. त्याचे अवलोकन करावे.

आगीच्या घटनात बाधित क्षेत्राची व्याप्ती आणि नुकसानीचे स्वरूप लक्षात घेता क्षेत्राची तपासणी कोणी करावी या बाबतचे निर्देश खालीलप्रमाणे आहेत.

- ❖ आगीमुळे जळालेले क्षेत्र २ हेक्टरपर्यंत असेल व नुकसानीची किंमत रुपये ५०००/- पर्यंत असेल तर अशा क्षेत्राची तपासणी संबंधित वनपाल किंवा त्यावरील अधिका-याने करुन पंचनाम्याची तपासणी माहिती मिळाल्यापासुन ३ दिवसाचे आत करावी व चौकशी पूर्ण करावी.
- ❖ जर जळीत क्षेत्र २ हेक्टरपेक्षा जास्त असेल व नुकसानीची किंमत रुपये ५०००/- पेक्षा जास्त असेल किंवा रोपवनात आग लागलेली असेल तर असे क्षेत्र कमीतकमी संबंधित वनपरिक्षेत्र् अधिकारी दर्जाच्या अधिका-याने तपासून पंचनाम्याची तपासणी करुन चौकशीची कार्यवाही करावी.
- ❖ जर नुकसानीची व्याप्ती रुपये १००००/- पेक्षा जास्त असेल व जळीत क्षेत्र ५ हेक्टरपेक्षा जास्त असेल तर अशा क्षेत्राची पाहणी उप वनसंरक्षकांनी स्वतः करावी अशा प्रकरणाची चौकशी संबंधित सहा. वनसंरक्षक हे करतील.
- ❖ आगीबाबतचे प्रत्येक प्रकरण, ज्यामध्ये नुकसानी रुपये ५०००/- पेक्षा जास्त आहे व जळीत क्षेत्र २ हेक्टरपेक्षा जास्त असेल किंवा काष्ठ आगारास आग लागलेली असल्यास अशा प्रत्येक प्रकरणाचा अहवाल वनपरिक्षेत्र अधिकारी हे सरळरित्या मुख्य वनसंरक्षकांना सादर करतील. आगीचे स्वरुप व व्याप्ती लक्षात घेवून मुख्य वनसंरक्षक हे आगीची काही ठिकाणे स्वतः तपासणी करण्याबाबतचा निर्णय घेतील व आगीची इतर ठिकाणे तपासण्याकरीता मुख्य वनसंरक्षक हे त्यांच्या अधिनस्त असलेल्या राजपत्रित वनअधिका-यांना नियुक्त करतील.
- ❖ आगीमध्ये जर वन्यजीवांची हानी निदर्शनास आली तर अशा घटनांचा तपशिल संबंधित वनपरिक्षेत्र अधिका-याने सरळरित्या प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य यांना सादर करतील.
- ❖ आगीच्या मोसमांत, अ-प्राधिकृत व्यक्तिंना, अनोळखी व्यक्तिंना वनक्षेत्रात प्रवेश करण्यांस मज्जाव करावा. आगीबाबतच्या वनगुन्हे प्रकरणी आरोपी आढळून आल्यास त्याचे विरुध्द भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६ (१)(ब,क,ड,फ) आणि महाराष्ट्र (आगीपासून वनांचे संरक्षण) नियम १९८२ किंवा भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ३३ (१)(ड) च्या तरतुदीनुसार प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयात खटला दाखल करावा. अशी प्रकरणे न्यायालयात लढवितांना भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ६५ (अ) अन्वये सदर गुन्हा हा अजामीनपात्र आहे असे माननीय न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावे.
- ❖ जर वनकर्मचा-यांच्या निष्काळजीपणामुळे वनक्षेत्रात आग लागली असेल तर त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु करण्यात यावी.
- ❖ जर आग वनकामगार सहकारी संस्था किंवा तेंदू कंत्राटदार यांच्या अयोग्य कार्यपध्दतीमुळे आणि काडीकचरा साफ न केल्यामुळे लागल्याचे निदर्शनास आले तर त्यांचे विरुध्द करारनाम्याच्या शर्तीनुसार दंडात्मक कार्यवाही काटेकोरपणे बजाविण्यात यावी.
- ❖ वनगुन्ह्यांचा निपटारा करण्यास स्थायी आदेश क्रमांक ४२ अन्वये ७५ दिवसांचा कालावधी निर्धारित करण्यात आलेला आहे. आगीच्या वनगुन्हे प्रकरणी हाच कालावधी काटेकोरपणे पाळण्यात यावा.

उपरोक्त निर्देशाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधित वनाधिकारी/ कर्मचारी यांना देण्यात यावे. आगीच्या घटनांचा मासिक अहवाल सोबत दर्शविलेल्या सुधारित प्रपत्रात १ जानेवारी, २०१९ पासुन महिणा संपताच ५ तारखेपर्यंत या कार्यालयास प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी.

सहपत्रः-वरीलप्रमाणे

(मुकूल त्रिवेदी)
मुख्य वनसंरक्षक (वन विनियमन)
नागपूर

7-1-19

## स्थाई आदेश/प्रपत्र-१

## आगीच्या वनगुन्हे प्रकरणाचे मासिक प्रपत्र, वनवृत्त---------माहे---------२०१९

| अ.क्र. | वनविभाग | दिनांक व वेळ | | | | | प्राथमिक वनगुन्हा क्र.व दिनांक | आग ज्या क्षेत्रात लागली त्यांचे वनपरिक्षेत्र पातनश्रेणी, वनखंड क्र.,कुप क्रमांक/ गट क्र. | जळीत क्षेत्राभोवती नियमानुसार आग प्रतिबंधक उपाययोजना घेण्यात आल्या होत्या किंवा कसे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आग लागल्याचा दिनांक | आग लागल्याची वेळ | आग विझविण्याचा दिनांक | आग विझविण्याची वेळ | जळीत क्षेत्र (हे.) | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

| आगीमुळे झालेली नुकसान आणि अंदाजे किंमत | आगीचे संभाव्य कारण | आग विझविण्यासाठी केलेल्या उपाय योजना | आरोपीचा शोध घेण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न | पकडण्यात आलेली आरोपीची संख्या | जबाबदार अधिकारी/ कर्मचारी नाव/हुद्दा | चौकशिची कार्यवाही करणा-या अधिकारी/ कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | | | |

## प्रपत्र-२

## आगीमुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठीचे प्रपत्र (विभाग निहाय)

| अ.क्र. | आगीमुळे झालेली नुकसानी | परिमान | राखीव वनक्षेत्र (रुपये) | संरक्षित वनक्षेत्र (रुपये) | इतर वनक्षेत्रात (रुपये) | एकुण (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | इमारती लाकुड (घमि.) | | | | | | |
| २ | जळावू लाकूड (घमि.) | | | | | | |
| ३ | बांबू (नग) | | | | | | |
| ४ | गवत (क्विंटलमध्ये) | | | | | | |
| ५ | रोपवने (हेक्टर) | | | | | | |
| ६ | उभे वृक्ष (संख्या) | | | | | | |
| ७ | नैसर्गिक पुर्नउत्पत्ती (हेक्टरमध्ये) | | | | | | |
| ८ | कुरण क्षेत्र (हेक्टरमध्ये) | | | | | | |
| ९ | प्रजातीवार वन्यप्राणी (संख्या) | | | | | | |
| १० | वनविभागाची साधन सामुग्री | | | | | | |
| ११ | एकुण | | | | | | |